राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) २५ नोव्हेंबर २०१६

**पुणे व लातूर जिल्ह्यातील १४ नगरपरिषदांसाठी १ हजार ७०४ नामनिर्देनपत्रे**
**शंभर टक्के नामनिर्देशनपत्रे संगणक प्रणालीद्वारे**

मुंबई, दि.२५: नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्यात पुण जिल्ह्यातील १० व लातूर जिल्ह्यातील ४ नगरपरिषदांच्या ३२४ जागांसाठी १ हजार ७०४; तर थेट नगराध्यक्षपदाच्या १४ जागांसाठी एकूण १६२ नामनिर्देनपत्रे दाखल झाली आहेत. सर्व म्हणजे शंभर टक्के नामनिर्देनपत्रे संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त झाली आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, दुसऱ्या टप्प्यातील १४ नगरपरिषदांसाठी १४ डिसेंबर २०१६ रोजी मतदान होत आहे. त्यासाठी १९ नोव्हेंबर २०१६ ही नामनिर्देनपत्रे दाखल करण्याची अंतिम मुदत होती. नामनिर्देनपत्रे माघारीची अंतिम मुदत १ डिसेंबर २०१६ पर्यंत आहे. त्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईल.

पहिल्या टप्प्यात १६४ नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी सुमारे ७० टक्के नामनिर्देनपत्रे संगणक प्रणालीद्वारे प्राप्त झाली होती. पहिल्या टप्प्यात काही ठिकाणी वीज पुरवठा व इंटरनेट संदर्भात स्थानिक पातळीवर अडचणी येत असल्याच्या तक्रारी होत्या. त्या लक्षात घेवून कोणीही नामनिर्देशनपत्रे भरण्यासापासून वंचित राहू नये म्हणून पारंपरिक पद्धतीने नामनिर्देशनपत्रे भरण्याची मूभा देण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यासाठी मदत कक्ष, ई-म्युटेशन सुविधा इत्यादी उपाययोजना अधिक प्रभावी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे १०० टक्के नामनिर्देशनपत्रे संगणकी प्रणालीद्वारे प्राप्त झाली आहेत, असे श्री. सहारिया यांनी सांगितले.

०-०-०